अंधार आहे राजा त्याची भीती आहे
राणी नेर आहे भेदक त्याची गूढ आहे वाणी

संध्याकाळी बघा तुम्ही हळु हळू अंधारते
इकडे तिकडे सगळीकडे राज्य त्याचे पसरते

राज्यात त्याच्या शापामुळे आपण फक्त आंधळे
भुते-खेते यांना मात्र दिसत असते सगळे

अंधाराच्या राज्यात तुमची पाय हरवतात
शक्ती डोके सुद्धा सुन्न होते सुचत नाही

युक्ती सारखी समोर बसून असते अंधाराची राणी
पोटात गोळा आणत असतात तिची क्रूर गाणी

प्रकाशाला दिला दिवस आणि अंधाराला
रात्र दिवसा प्रसन्न होतो तरी रात्री गलितगात्र

अंधाराला भिऊन आम्ही उजेड करतो
दिव्याचा तरी बाहेर बघवत नाही डोंगरच अंधाराचा

राज्य त्याचे आहे तोवर आम्ही काही करणार नाही
झोपून जाऊ गुडुप गप डोळे मुळी उघडणार नाही

हळूच अंधार निघून जाईल तोवर आता उठणार नाही
झोपेतही आठवण त्याची मुळीसुद्धा काढणार नाही.